# PRESS NOTE

## ‘पीएमआरडीए’च्या माध्यमातून चाकण परिसरातील रस्ते विकासाला गती; महानगर आयुक्तांकडून ‘ऑन-फिल्ड’ पाहणी!

- **चाकण ‘डी-क्लॉग वर्क’मधील १७ किलोमीटर रस्त्यांची पाहणी; वाहतूककोंडी सोडविण्यासाठी ‘पीएमआरडीए’चे आश्वासक पाऊल!**

पुणे : पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (पीएमआरडीए) माध्यमातून चाकण औद्योगिक परिसरातील रस्ते विकासाला मोठी गती मिळाली आहे. ‘पीएमआरडीए’चे महानगर आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी सोमवारी (दि. १७) चाकण परिसरातील विकासकामांची प्रत्यक्ष स्थळावर जाऊन पाहणी केली व प्रलंबित कामांना मार्गी लावण्यासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली. खेड तालुक्यातील ‘चाकण डी-क्लॉग वर्क’अंतर्गत येणाऱ्या विविध रस्त्यांच्या कामांची त्यांनी सकाळी साडेदहा ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत सविस्तर स्थळपाहणी केली.

कामात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असा कडक इशारा देत महानगर आयुक्तांनी रस्त्यांची कामे तत्काळ मार्गी लावण्याचे निर्देश दिले आहेत. दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास ब्लॅकलिस्ट करण्याचा इशाराही त्यांनी संबंधित ठेकेदारांना दिला आहे.

चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूककोंडी सोडविण्यासाठी ‘पीएमआरडीए’कडून एकूण १७ किलोमीटर लांबीच्या सात रस्त्यांचा विकास वेगाने करण्यात येत आहे. नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी ही कामे वेगाने आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण व्हावीत, या उद्देशाने महानगर आयुक्तांनी प्रशासकीय अधिकारी आणि ठेकेदारांना महत्त्वपूर्ण निर्देश दिले. कामाचा दर्जा आणि गती याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, हे स्पष्ट करत त्यांनी प्रकल्प विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी कडक शिस्तीचे पालन करण्याचे आणि उत्तरदायित्वाची जाणीव ठेवण्याचे निर्देश दिले.

चऱ्होली खुर्द ते आळंदी (मरकळ रोड डीपी रस्ता) या दोन किलोमीटर रस्त्याचे काम तातडीने व दर्जेदार पद्धतीने व्हावे, यासाठी कंत्राटदारांना प्रोत्साहित करण्यासोबतच दर्जा न राखल्यास कारवाईची तरतूदही स्पष्ट करण्यात आली. तसेच, पुणे-नाशिक रस्ता-आळंदी फाटा (चाकण) ते आळंदी या टप्प्यावरील रस्त्यांची सुधारणा तातडीने सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. कुरुळी फाटा ते निघोजे या अडीच किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे काम प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत निर्देश देण्यात आले. खालुंब्रे ते एमआयडीसी फेज-२ या रस्त्याचे काम प्राधान्याने घेण्यात आले असून, मौजे चिखली ते मोई या मार्गावर सद्यस्थितीत रुंदीकरणाचे काम सुरू करून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या प्रत्यक्ष देखरेखीखाली हा प्रकल्प विनाअडथळा पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

कुरुळी फाटा ते निघोजे या अडीच किलोमीटर लांबीच्या मार्गावरील सात मीटर रुंदीच्या पूर्ण सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम १५ दिवसांच्या 'बार चार्ट'नुसार पूर्ण करण्याचे आदेश महानगर आयुक्तांनी दिले. गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता महावितरणचे पोल हलवणे, नाल्यावर क्रॅश बॅरिकेड्स बसवणे आणि एमआयडीसीतील मर्सिडीज चौक येथील बॉटलनेक दूर करून वाहतूक वळवण्याचे योग्य नियोजन करावे, असे त्यांनी अधिकाऱ्यांना बजावले.

या महत्त्वपूर्ण पाहणी दौऱ्यात प्रभारी मुख्य अभियंता (रस्ते विकास) शिवप्रसाद बागडी, कार्यकारी अभियंता शिवकुमार कुपल, उपअभियंता नंदकुमार खोत, कनिष्ठ अभियंता जितेंद्र पगार यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, कंत्राटदार आणि प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्सल्टंट उपस्थित होते. सर्वांच्या समन्वयातून हा प्रकल्प यशस्वीपणे पूर्णत्वास नेण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

***प्रकल्पाची ठळक वैशिष्ट्ये***

• योजनेचे नाव : चाकण डी-क्लॉग वर्क

• उद्दिष्ट : चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाहतूककोंडी सोडवून दळणवळणास लागणारा वेळ कमी करून वाहतूक सुलभ करणे.

• शाश्वत सुविधा : या प्रकल्पांतर्गत पुढील १० वर्षे देखभाल आणि दुरुस्तीची जबाबदारी ठेकेदारावर निश्चित करण्यात आली आहे, ज्यामुळे रस्त्यांचा दर्जा दीर्घकाळ टिकून राहील.

• प्रशासकीय मान्यता व निधी : या प्रकल्पासाठी एकूण १००.१४ कोटी रुपयांची प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

• सद्यस्थिती : 'पीएमआरडीए'च्या प्रयत्नांमुळे प्रकल्पातील सर्व रस्त्यांची कामे प्रगतीपथावर आहेत.

---

**पुरूषोत्तम सांगळे,** माहिती व जनसंपर्क अधिकारी, पीएमआरडीए